आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ मे २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जगाला भारताच्या सामर्थ्याची जाणीव करुन देणाऱ्या, मजबूत सरकार चालवणाऱ्या नेत्याची निवड करण्याची संधी जनतेला या निवडणुकीत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- तर, शेतकऱ्यांच्या मेहनतीला किंमत न देणाऱ्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नसल्याची शरद पवार यांची टीका
- मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ वर / बचाव कार्य पूर्ण
- शेवटच्या तासात झालेल्या खरेदीमुळं मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७७ अंकांची वाढ

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या जोडीचा दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

जगाला भारताच्या सामर्थ्याची जाणीव होईल अश्याप्रकारे मजबूत सरकार चालवणाऱ्या नेत्याची निवड करण्याची जनतेला या निवडणुकीत संधी आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री आणि भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी आज केलं. उत्तर प्रदेशात जौनपूर इथं भाजपा उमेदवाराच्या प्रचारार्थ मोदी यांनी सभा घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यापूर्वी देशातल्या मोठ्या शहरांच्या विकासाला खीळ बसली होती. पण, आता अयोध्या आणि काशीसारख्या शहरांमध्ये विकास होत आहे, असा दावा

मोदी यांनी केला. भाजपा दिलेलं वचन पूर्ण करणारा पक्ष आहे हे यावरून स्पष्ट होतं, असंही मोदी म्हणाले.

त्यानंतर भदोही आणि आझमगड जिल्ह्यातल्या लालगंज इथं नरेंद्र मोदींच्या सभा झाल्या. यात नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि समाजवादी पक्षांवर जोरदार टीका केली. दोन्ही पक्ष घराणेशाही आणि भ्रष्टाचारात बुडालेले आहेत, असा आरोप मोदी यांनी केला.

दरम्यान, काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांची रायबरेली मतदारसंघात प्रचारसभा झाली. भाजपा बेकायदा कृत्यांची पाठराखण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. केंद्र आणि राज्य सरकार दोन्हीही भ्रष्टाचारात आकंठ बुडाले आहेत, अशी टीका समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी आपल्या बांदा इथल्या प्रचारसभेत केली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या मेहनतीला किंमत न देणाऱ्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. धुळे लोकसभा मतदारसंघातल्या सटाणा इथं प्रचारसभेत ते बोलत होते.

धुळे, नाशिक, सातारा, पुणे या सर्व भागात शेतकर्यांच्या कांद्याचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या मालाला चांगले भाव मिळत नाही. तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नाशिकच्या सभेत याविषयावर फार बोलले नाही, असं ते म्हणाले. चीनकडून सीमाभागात होत असलेल्या आक्रमकतेला केंद्र सरकार प्रत्युत्तर देत नाही. त्यामुळं परिस्थिती बदलायची असेल तर भाजपाचा पराभव करणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

महायुतीचे नाशिक लोकसभा मतदारसंघातले उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी आज नाशिक शहरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रोड शो करण्यात आला. या रोड शोच्या समारोपाच्या वेळी शिंदे पुन्हा एकदा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. निवडणूकीत गाफील न राहता मतदान करा आणि देशाला महासत्ता होण्यासाठी मदत करा, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

मोदी सरकारनं गेल्या १० वर्षांत आणलेल्या गरीब कल्याण योजनांच्या यशामुळे काँग्रेसकडे प्रचारासाठी मुद्देच नाहीत, म्हणून काँग्रेस आरक्षण आणि संविधानाच्या मुद्द्यावर मतदारांची दिशाभूल करत आहे, असा आरोप भाजपा ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. लक्ष्मण यांनी केला आहे. भाजपा प्रदेश कार्यालयात आज झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जातीय विभाजनाचं राजकारण करत आहे. मात्र देशातला शोषित, वंचित समाज भाजपाच्या मागे उभा आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

अयोध्येत पाचशे वर्षांनंतर उभारण्यात आलेलं राम मंदिर सरकारची इच्छाशक्ती दाखवणारं आहे, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज बिहारमधल्या सीमामढी इथं प्रचारसभेत बोलत होते. राम मंदिराची उभारणी करुन नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दिलेलं आश्वासन पूर्ण केलं आहे असंही ते म्हणाले. राम मंदिर प्रश्नी काँग्रेसनं नेहमीच चालढकलं केल्याची टिकाही त्यांनी केली.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण **'दक्षिण मुंबई'** लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

गेल्या १० वर्षात नरेंद्र मोदी सरकारनं कामगार हिताचे कायदे बदलून उद्योगपतीधार्जिणे कायदे बनवले, कामगारांना देशोधडीला लावलं, असा आरोप कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला आहे. ते आज मुंबईत राष्ट्रीय मजदूर काँग्रेसच्या मेळाव्यात बोलत होते. १५ टक्के बजेट मुस्लीमांसाठी ठेवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता असा खोटा आरोप मोदी यांनी केला आहे. पराभव दिसू लागल्यानं निराशेतून ते काहीही बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ झाली आहे. काल रात्री एका वाहनात आणखी दोन मृतदेह आढळले. याठिकाणचं बचाव कार्य पूर्ण झालं असून आज दिवसभरात राडारोडा हटवला जाईल, अशी माहिती मुंबईचे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आज दिली. याठिकाणचे इतर ३ विनापरवाना फलक काढायचं काम सुरू आहे. मुंबई शहरातल्या इतर अशाच फलकांची तपासणी सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी दिसून आली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७७ अंकांची वाढ झाली, आणि तो ७३

हजार ६६४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २०३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ४०४ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

बँकॉक इथं सुरु असलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरी सामन्यात आज भारताच्या सात्विक साईराज रेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. या दोघांनी चीनच्या झी हाओ नान आणि झेंग बुई हान या जोडीचा २१-१६,२१-११ असा पराभव केला. पुरुष एकेरीत भारताच्या मेईराब लुवांग मैसनाम नं डेन्मार्कच्या मॅड्स क्रिस्टनसनचा २१-१४,२२-२० असा पराभव करत उपउपांत्य फेरी गाठली आहे.

<><><><><>

भारतीय फूटबॉलपटू सुनील छेत्री यानं आपली निवृत्ती आज समाजमाध्यमाद्वारे जाहीर केली. कुवेतशी कोलकत्यात ६ जून रोजी होणारा सामना त्याचा शेवटचा सामना असणार आहे. सुनील छेत्रीनं २००५ साली पाकिस्तानविरोधातल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय फूटबॉलमध्ये पदार्पण केलं होतं. दीडशे आंतराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे. सुनील हा क्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनल मेस्सीनंतर जगातला सर्वाधिक गोल करणारा फूटबॉलपटू म्हणून ओळखला जातो.

<><><><><>

पुढचे पाच दिवस वायव्य भारत आणि बिहारमधे उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. याकाळात राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि

दिल्लीच्या काही भागांमधे ही लाट तीव्र असण्याची शक्यता आहे. पूर्व आणि मध्य भारतातही येत्या शनिवारपासून उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

भारताच्या दक्षिणेकडच्या भागांमधे येत्या २२ तारखेपर्यंत जोरदार ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. नैऋत्य मोसमी पाऊस अंदमान समुद्र, बंगालच्या उपसागराच्या आग्नेयकडच्या काही भागात आणि निकोबार बेटांवर येत्या तीन दिवसात पुढं सरकण्याची शक्यता आहे.

वायव्य, मध्य आणि पूर्व भारत तसंच महाराष्ट्र आणि गुजरातमधे पुढच्या तीन-चार दिवसात कमाल तापमान टप्प्या-टप्प्यानं दोन ते चार अंश सेल्सियसनं वाढण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात ४५ कोटींपेक्षा जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे, अशी माहिती भारत निवडणूक आयोगानं आज दिली आहे. लोकसभा निवडणुकीत आतापर्यंत ६६ पूर्णांक ९५ शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे. भारतीयांनी भरघोस मतदान करणं हा जगासाठी संदेश असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. तसंच निवडणुकीच्या उरलेल्या टप्प्यात लोकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावं असं आवाहनही आयोगानं केलं आहे.

**<><><><><>**

विशेष न्यायालयानं सक्तवसुली संचालनालयाच्या तक्रारीची दखल घेतल्यानंतर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातल्या संशयितांना सक्तवसुली

संचालनालय अटक करू शकत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं आज दिला.

संचालनालयाला जर एखाद्या संशयिताचा ताबा हवा असेल, तर त्यासाठी त्यांना विशेष न्यायालयात अर्ज करावा लागेल, असं न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने नमूद केलं.

**<><><><><>**

माजी आमदार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक विश्वास गांगुर्डे यांचं आज पहाटे पुण्यात अल्प आजारानं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते.

**//<><><><><>//**